# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०२/२०२५ (रविवार)**

---

## _क्रिकेट सट्टा /बेटिंग वर प्रतिबंध करणे कामी नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी ८६ संशयीतांना केले स्थानबध्द

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांची अवैध धंदयावर करडी नजर असुन आज रोजी भारत विरूध्द पकीस्तान चॅम्पीयन ट्रॉफी ,क्रिकेट सामना असल्याने किक्रेट सट्टा /बेटिंग वर प्रतिबंध होणे कामी मा.पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलीसांनी किक्रेट सट्टा /बेटिंग करणारे एकुण ८६ संशयीत आरोपीतांना स्थानबद्ध केले. सदर वेळेत सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी आणि सर्व ठाणे प्रभारी अधिकारी आपआपल्या हददीत सक्त पेट्रोलींग करीत आहेत.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद. जिल्हा वाहतुक शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई, २ आरोपी अटक.

दिनांक २२/०२/२०२५ रोजी जिल्हा वाहतुक शाखेचे पथक पोलीस स्टेशन कन्हान अंर्तगत वाहतुक केसेस तसेच पेट्रोलिंग करित असतांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती मिळाली की, मौजा बोरडा शिवारात देवलापार ते नागपुर रोड अवैधरित्या जानावरांची वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौजा बोरडा शिवारात बॅरेकगेट सह नाकाबंदी करीत असताना आयसर ट्रक क्र.एम.एच. जी.बी. ९१४३ हा संशयीतरित्या जाताना दिसल्याने वाहनास थांबवुन वाहन चेक केले असता आयसर गाडीमध्ये डाल्यात लाल,काळया व पांढ—या रंगाचे एकुण ३२ बैल गोवंश जातीचे मिळुन आले . जनावारांना निर्दयतेने, कुरतेने ,यातना देवुन त्यांचा मानेला व पायांना आखुड दोरीने बांधुन चारापाणी न देता गाडीत ठेवले होते. मिळुन आलेले आरोपी चालक सरफराज खान वल्द समद खान, वय २८ वर्षे ,रा.ताजनगर, टेकानाका

शायर रजा मज्जीद जवळ, नागपुर आणि क्लिनर आरोपी क्र २. जावेद शेख जफर, वय ३२ वर्षे, रा.ताजबाग, सिंधीवन मकबुल किराणा स्टोर्स जवळ, नागपुर त्यांना जनावरांबाबत विचारपुर केली असता त्यांनी जनावरे बालाघाट,मध्य प्रदेश येथुन आरोपी क्रं. ३ संतु काका नामक व्यक्ती रा. जगलपुर या व्यक्तीकडुन आणल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपीच्या ताब्यातुन **३२ बैल गोवंश जातीचे प्रत्येकी २०,००० रूपये प्रमाणे एकुण किंमती ६ लाख ४० हजार रूपाये आणि आयसर ट्रक क्र.एम.एच. जी.बी. ९१४३ किंमती १७ लाख रूपये एकुण २३ लाख ४० हजार रूपयेचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**आरोपी चालक सरफराज खान वल्द समद खान वय २८ वर्ष रा.ताजनगर टेकानाका शायर रजा मज्जीद जवळ नागपुर ,क्लिनर २. जावेद शेख जफर वय ३२ वर्ष रा.ताजबाग सिंधीवन मकबुल किराणा स्टोर्स जवळ नागपुर व पाहीजे आरोपी नामे ३) .संतु काका नामक व्यक्ती रा. जगलपुर** यांचे विरूद्ध कलम ११(१),(क),(ड),(च),(ज),(ट),(झ) म.प्रा.छ.प्र.अधिनियम, कलम (अ)(१),५(२)(ब),९ म.पशु संरक्षण अधिनियम ,३२५, ३(५)बी.एन.एस.कायदा सहकलम ११९ महा.पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.

## सुगंधीत तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर कायदेशीर कार्यवाही

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक २१/०२/२०२५ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, मोहदी दळवी रोडने रेल्वे पटरीच्या बाजूला महाराष्ट्र राज्यात बंदी असलेल्या सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. पोलीसांना माहीती मिळताच त्यांनी घटनास्थळी जावुन नाकाबंदी केली असता १८:४५ वाजता मोटर सायकल होंडा शाईन क्र एम. एच—४०/सि.एस—५५१८ हे संशयीत रित्या मिळुन आले. चालकाला नाव पत्ता विचारले असता रामेश्वर हिरालाल जुगसेनिया, वय ४१ वर्षे, रा. गोधणी, तह. काटोल, जि. नागपूर अशी माहीती प्राप्त झाली. वाहनाची तपासणी केली असता वाहनावर एका काळसर रंगाच्या कापडी पोत्यात प्रतिबंधित अन्नपदार्थ मिळुन आले. त्यानंतर लगेच मोपेड सुझुकी क्र एम.एच—४०/सि. व्ही—१७९९ हे संशयीत रित्या मिळुन आले. चालकाला नाव पत्ता विचारले निखील राधेश्याम खरपुरिया, वय २८ वर्षे, रा. भोरगड, तह. काटोल, जि. नागपूर अशी माहीती प्राप्त झाली.

वाहनाची तपासणी केली असता का काळसर रंगाच्या कापडी पोत्यात प्रतिबंधित अन्नपदार्थ मिळुन आले. दोन्ही आरोपीच्या ताब्यातुन सुगंधीत तंबाखु ब्लॅक लेबल, पानमसाला राजश्री ब्रॅड,विमल पानमसाला,सुगंधीत तंबाखु व्ही वन,जनम असे सुगंधीत तंबाखु व पान मसाला एकुण किंमती ६७,०७५/— रूपये आणि दोन मोटर सायकल किंमती १,३०,०००/— रूपये असा एकूण **१,९७,०७५ /— रुपयाचा रुपयाचा मुद्देमाल आरोपीचे ताब्यातुन पंचासमक्ष** जप्त करण्यात आला आहे.

**आरोपी नामे १) रामेश्वर हिरालाल जुगसेनिया, वय ४१ वर्षे, रा. गोधणी, तह. काटोल, जि. नागपूर, २) निखील राधेश्याम खरपुरिया, वय २८ वर्षे, रा. भोरगड, तह. काटोल, जि. नागपूर यांच्या विरूध्द** अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ व त्याखालील नियम व विनियमन २०११ चे कलम २६(१), २६(२)(४), २७(३)(इ), ३०(२) (अं), कलम ३ (१) (झेड.झेड) (४) सहकलम १२३, २७४, २७५ व २२३ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.आरोपी अटक करण्यात आली असून गुन्हयाचा सखोल तपास सुरू आहे

## अवैधरित्या रेतीची चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक २२/०२/२५ रोजी खापरखेडा पोलीस हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की बिना संगम घाटाचे कन्हान नदी पात्रात अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरी केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे बिना संगम घाटाचे कन्हान नदी पात्र येथे जावुन पाहणी केली असता नदीपात्राचे काठावर ट्रक क्रमांक एम एच ४०—३२७६ मिळुन आले. वाहनाची पाहणी केली असता डाल्यामध्ये रेती नव्हती. पोलीसांची चाहुल लागताच वाहन घटनास्थळावर सोडुन आरोपी पळुन गेले. पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष ट्रक क्रमांक एम एच ४०—३२७६ **असा एकुण ६,००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

ट्रक क्रमांक एम एच ४०—३२७६ च्या चालक /मालक **याच्या** विरूध्द पोस्टे खापरखेडा येथे ६२ बी.एन.एस, ४८,४८(७),४८(८)म.ज.म.स,४,२१ खान खनिज अधिनियम, ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ **अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस माहीती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर